


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

IRBK-0108804

६१० कृ०
८८०४.

अनुक्रम ३०८०८
विभाग
क्रमांक २८७८
नों. दि.

नवसाक्षर प्रौढासाठी

# जगाचे शांतिदूत

लेखक

गं. भा. निरंतर

किंमत

३५ नवे पैसे

तिसरी श्रेणी



वा. क ८८०४ नों. दि ..........
IRBK-0108804

प्रकाशक : व्ही. बी. कर्णिक, चिटणीस, महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समिति, ३१९ सोमवार पेठ, पुणें २.

मुद्रक : व्ही. आर. शिंगरे, सर्वोदय मुद्रणालय, ४५० बुधवार पेठ, पुणें २.

# जगाचे शांतिदूत

## पाहू जाता एक देव !

गांधीजी दररोज संध्याकाळी प्रार्थना करीत. प्रार्थनेस पुष्कळ लोक जमत असत. गांधीजी भजन म्हणत—



ईश्वर अल्ला तेरा नाम
सबको सन्मति दे भगवान्

गांधीजींच्या बरोबर सर्वजण म्हणत

ईश्वर अल्ला तेरा नाम
सबको सन्मति दे भगवान्

प्रार्थनेस सर्व जातींचे लोक येत. सर्व धर्मांचे लोक येत. सर्व-जण एक सुराने भजन करीत.

गांधीजींनी भजनासाठी वरील ओळी मुद्दाम निवडल्या होत्या. त्याना एक मोलाची शिकवण द्यावयाची होती. देव एकच आहे. त्याला ईश्वर म्हणा नाही तर अल्ला म्हणा. पुष्कळ लोकांची अशी समजूत होती कीं, अल्ला निराळा. ईश्वर निराळा. राम निराळा. रहिम निराळा.

देव निरनिराळे म्हणून भक्तहि निरनिराळे. यातून मग भांडणे होतात. तुमचा देव मोठा कीं आमचा देव मोठा!

म्हणून गांधीजी देवाची प्रार्थना करीत.

सबको सन्मति दे भगवान. गांधीजींनी जे सांगितले तेच यापूर्वी अनेकानी सांगितले. पण लोक कांही गोष्टी विसरतात. थोडेसे मुलासारखेच असते लोकांचे मन. पण आई सांगायला कंटाळत नाही. जगातले थोर पुरुष जगाशी आईसारखेच वागतात. असे थोर पुरुष मधून मधून जन्म घेतात. जगाला ज्यांचा विसर पडला ते पुन्हा एकदा सांगतात. सर्वांचे सांगणे एकच, कारण शांततेचा, सर्वांच्या कल्याणाचा मार्ग एकच. जगातील कांही शांतिदूताकडेच जाऊ या. म्हणजे त्यांचे म्हणणे स्पष्ट होईल.

चला, या शांतिदूतांच्या दर्शनास निघू या. एक मोठी तीर्थयात्राच करावयाची आहे.

अनुक्रम 30008
2808

# भगवान श्रीकृष्ण



ही पाहा मथुरा आली. वृंदावन दिसू लागले. गोकुळहि दिसत आहे. गोपालकृष्ण येथेच गोपालांबरोबर खेळला. मुरलीधराची मुरली येथेच वाजत होती. येथील धुळीचा प्रत्येक कण पवित्र आहे. ही भूमि अतिशय पवित्र आहे. या भूमीला वंदन करू या.

कृष्णाचा जन्म येथेच झाला. श्रावणाचा कृष्ण पक्ष होता. कृष्णपक्षातली अष्टमी होती. त्या दिवशी मध्यरात्री कृष्ण जन्मला. मथुरा हीहि त्यावेळी एक अंवार नगरी होती. तेथे कंस राज्य करीत होता. कंस हा उग्रसेनाचा मुलगा. बापाला बाजूस सारुन कंसाने गादी मिळविली.

कृष्णाची आई देवकी ही कंसाची बहिण होती. तिचा नवरा वसुदेव. कंसाने दोघानाहि कैदेत टाकले होते. कैदखान्यातच कृष्णाचा जन्म झाला.

कंस कृष्णाला जन्मल्याबरोबर ठार करणार होता. पण कृष्ण त्याच्या हाती लागला नाही. देवकीने कृष्णाला जन्म दिला. यशोदेने त्याला वाढविले. कृष्ण गोकुळातच वाढला. सर्व गोकुळ त्याने आनंदित केले. सगळे गोप म्हणजे गवळी त्याचे मित्र होते. सर्व गोपी त्याचे हट्ट पुरवीत.

कृष्ण गोकुळात आहे हे कंसाला समजले. त्याला ठार करण्याचे कंसाने ठरवलेच होते. कंसाने कपटाचे पुष्कळ बेत केले. पण शेवटी कृष्णानेच त्याला ठार केले.

मथुरेत आनंदी आनंद झाला. सर्व लोक कृष्णाला म्हणाले, तूंच आमचा राजा हो. कृष्णाला राज्य नको होते. त्याने उग्रसेनाला बोलावले. आपल्या हाताने त्याच्या डोक्यावर मुकुट ठेवला.

दुष्टांचा नाश करावयाचा. दीनाचे रक्षण करावयाचे. हे कृष्णाचे व्रत होते.

कंस ठार झाला पण त्याचे साथीदार जिवंत होते. त्यानी मथुरेवर हल्ला केला. कृष्णाला वाटले माझ्यामुळे मथुरेवर संकट आले. त्याने नवे शहर वसविले. तिचे नाव द्वारका. द्वारकेस जाऊन कृष्णाने शत्रूशी सामना केला. युद्धाच्या वणव्यातून मथुरेच्या लोकाना वाचविले.

कृष्ण मग पांडवाच्या मदतीस गेला. कौरव पांडवांचा छळ करीत. पण कृष्ण पांडवांचा पाठीराखा होता. पांडव जुगारात हरले.

द्रौपदी कौरवांची दासी झाली. दुःशासनाने तिला भर सभेंत खेचीत आणले. तो तिची विटंबना करू लागला. द्रौपदीने कृष्णाचा धावा केला. कृष्णाने द्रौपदीमाईची लाज राखली. पांडव वनवास भोगीत होते. कृष्णसखा त्याना धीर देई. पांडव वनवासातून सुखरुप बाहेर पडले.

पांडवाचे राज्य कौरव परत देईनात. कृष्णाने कौरवाना पुष्कळ सांगून पाहिले. त्याची शिष्टाई वाया गेली. शेवटी लढाई अटळ झाली. अर्जुनाचा रथ हाकण्याचे काम कृष्णाने पत्करले.

लढाईचा दिवस उगवला. कुरुक्षेत्रावर दोन्ही सैन्ये जमली. अर्जुन रथात उभा राहिला. त्याने कौरव सैन्याकडे नजर टाकली. तेथे अर्जुनाचे गुरु होते. मित्र होते. नातलग होते. अर्जुनास शस्त्र उचलवेना.



अर्जुन कृष्णाला म्हणाला, मी युद्ध करणार नाही. माझ्या गुरुवर, माझ्या भावावर बाण सोडणे हे पाप आहे. हे पाप मी करणार नाही. मला राज्यहि नको.

कृष्णाने अर्जुनास सांगितले, " कौरव तुझे नातलग आहेत; पण ते दुष्ट आहेत. ते न्याय लाथाडतात. सत्य जुमानीत नाहीत. अशा माणसाना ठारच केले पाहिजे. दुष्टांचा नाश करणे हेच क्षत्रियाचे

कर्तव्य आहे. कर्तव्य नातेगोते ओळखत नाही. कर्तव्य करताना कठोर व्हावे लागते. लाभ होवो नाहीतर तोटा होवो, कर्तव्य केलेच पाहिजे. आपापले कर्तव्य करणे हीच देवाची भक्ति."

देवाकडे जाण्याची अतिशय सोपी वाट कृष्णाने दाखविली. मनापासून भक्ति केली कीं देव पावतो. मनुष्य कोणत्याहि कुळात जन्म घेवो. तो ज्ञानी असो नाहीं तर अज्ञानी असो. तो पापी का असेना, देवाला जो शरण जातो त्याला देव पावतो. प्रत्येक नदी शेवटी समुद्राला मिळते. तसा प्रत्येक भक्त शेवटी देवाजवळच जातो. निरनिराळे धर्म हे एकाच शिखराकडे जाणाऱ्या वाटा आहेत. ज्याला जी वाट सोईची वाटेल त्या वाटेने त्याने जावे.

कृष्णाचा उपदेश अर्जुनास पटला. कर्तव्य म्हणून अर्जुनाने कौरवाशी लढाई केली. अठरा दिवस भयंकर लढाई झाली. अर्जुन विजयी झाला. पांडवाना जय मिळाला. दुष्ट कौरवांचा पूर्ण नाश झाला. पृथ्वीचा भार हलका झाला.

पांडवांचे राज्य पांडवाना मिळाले. कृष्णाने त्याना न्याय मिळवून दिला. नंतर कृष्ण द्वारकेस गेला. द्वारका सोन्याची झाली. सर्व लोक अतिशय सुखी झाले. दुष्टांचा नाश करणे हे कृष्णाचे काम होते. सज्जनांचे रक्षण करणे हे कृष्णाचे काम होते. ही कामे कृष्णाने पूर्ण केली.

एक दिवस तो रानात झाडाखाली बसला होता. तो चिंतन करीत होता. रानात एक शिकारी आला होता. त्याचा बाण चुकून कृष्णाच्या पायास लागला. तेच निमित्त झाले. कृष्ण मरण पावला. तुरुंगात जन्म आणि अरण्यात मृत्यु असे कृष्णाचे जीवन आहे.

कृष्णाने अर्जुनाला उपदेश केला. तो उपदेश भगवद्गीता या ग्रंथात आहे. तो उपदेश जगास कल्याणाचा मार्ग दाखवीत आहे. खरी भक्ति, खरा भक्त, खरा लोकसेवक, खरा ज्ञानी यांची ओळख या ग्रंथावरून होते. कृष्णाने जो उपदेश केला तोच ज्ञानेश्वराच्या ज्ञानेश्वरीत आहे. एकनाथानी भागवतात तोच उपदेश केला. तुकारामाचे अभंग हाच उपदेश सांगतात. गांधीजींना गीता अतिशय आवडत असे. टिळकांनीहि गीतेचा अर्थ सांगितला. विनोबाना गीता आपल्या आईसारखी वाटते. कृष्णाचा उपदेश आपण ऐकला. आता इतर देशात जाऊ या. इतर देशातहि शांतिदूत होऊन गेले. त्या शांतिदूतानी कोणता उपदेश केला? त्यांच्या दर्शनास जाऊन त्यांचा उपदेश ऐकू या.

# भगवान येशू



आतां आपण भारताच्या पश्चिमेस आलो. एका धर्मभूमीत आपण प्रवेश करीत आहोत. या प्रांतास पॅलेस्टाईन म्हणतात. या प्रांतात बेथलहेम नावाचे एक गाव आहे. तेथे सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी जोसेफ नावाचा एक मेंढपाळ होता. त्याच्या बायकोचे नाव मरीया. जोसेफच्या गोठ्यात एक दिवस एक तान्हे मूल दिसले. ते फडक्यात गुंडाळलेले होते. त्या मुलाच्या तोंडावर अतिशय तेज झळकत होते. सर्व गावात ही बातमी पसरली. सर्व मेंढपाळ म्हणाले, 'हा देवाचा अवतार आहे.' त्यांचे म्हणणे खरेच होते, एका गरीब मेंढपाळाच्या गोठ्यात देवाने अवतार घेतला होता.

जोसेफ व मरीया यानी त्या मुलास सांभाळले. येशू असे त्याचे नाव ठेवले.

येशू मोठा होऊ लागला. त्याचे देवपण हळू हळू दिसू लागले.

किनाऱ्यावर एक जकातदार होता. सर्व लोक त्याला दूर लोटीत. तो हलक्या जातीतला होता. त्याला वाटे येशूने आपल्या घरी यावे. आपली भाजीभाकरी खावी. येशूला त्याने आमंत्रण दिले. येशू त्याच्या घरी गेला. त्याची भाजीभाकरी खाल्ली. गावातील कांही लोकानी येशूला नावे ठेविली. येशू बाटला असे ते म्हणाले. येशू त्यांना म्हणाला." तुम्ही अशा गरीब लोकाना कां दूर लोटता ? गरिबांच्याच मनात देव असतो. मी अशा गरिबांचीच सेवा करणार आहे. जे नम्र आहेत त्यानाच देवाजवळ जाण्याची वाट लवकर सापडते."

येशूचे देवपण कांहीना सहन होईना. ढोंगी धर्मगुरु त्याच्यावर संतापले. ते त्याचा छळ करू लागले. येशूने गरिबांची सेवा सोडली नाही.

तो स्वतः रोग्यांची शुश्रूषा करी. त्याच्या हातगुणाने अनेकांचे रोग बरे झाले. लोक त्याला देव मा. लागले. येशू म्हणे, 'मी देव नाही. मी तुमचा सेवक आहे.'

येशू सर्वांना सांगे, देव सर्वांवर प्रेम करतो. तुम्हीहि सर्वांवर प्रेम करा, म्हणजे देवहि तुमच्यावर प्रेम करील. शत्रूहि प्रेमानेच जिंकता येतात. प्रेमाने दुष्टहि मित्र होतात."

एकदा एका बाईच्या हातून एक मोठे पाप झाले. गावातील लोक खवळले. ते तिला दगड मारू लागले. येशूने ते पाहिले. ते

एकदम पुढे झाला. लोकांच्या पुढे जाऊन उभा राहिला. तो त्याना म्हणाला.



" ज्याने कधीहि पाप केलं नाही असा तुमच्यात कोण आहे? त्यानेच हात उगारावा. इतराना या बाईला मारण्याचा काय अधिकार आहे?"


येशूचे शब्द ऐकताच लोक शांत झाले. त्यांचे हात खाली आले. हातातून दगड गळून पडले. येशू त्याना प्रेमळपणे म्हणाला.

" न्याय करण्याचा अधिकार फक्त परमेश्वराला आहे. क्षमा करणे एवढेच माणसाच्या हाती आहे. या गरीब बिचाऱ्या स्त्रीला क्षमा करा. तिला चूक सुधारण्याची संधि द्या. तिच्यासाठी आपण देवाची प्रार्थना करू या."

येशू अशा रीतीने सर्वांना दयाधर्म शिकवीत होता. देव दयाळू आहे हे तो पटवीत होता. पोटभरू धर्मगुरू लोकाना देवाची भीति दाखवीत. येशूने त्यांचे ढोंग चव्हाट्यावर आणले. धर्मगुरूंनी त्या प्रांताच्या न्यायाधिशाचे कान फुंकले. येशू लोकाना खोटा धर्म

शिकवतो. स्वतःला देवाचा मुलगा म्हणवितो. हा भयंकर गुन्हा आहे असे न्यायाधिशाने ठरविले.

येशू गुन्हेगार ठरला. त्याच्या गुन्ह्याची चौकशी करण्यासाठी गावात मोठी सभा भरली. येशू म्हणाला. " देव दयाळू आहे हे खरे आहे. ते सांगणे हा माझा गुन्हा असेल तर मला खुशाल शिक्षा करा."



येशूला भयंकर शिक्षा देण्यात आली. एका चौकात एक खांब उभारण्यात आला. खांबाच्या वरच्या बाजूस एक आडवी फळी लाविली होती. येशूला त्या खांबाशी बांधण्यात आले. आडव्या फळीवर त्याचे हात बांधले होते. मग त्याच्या हातावर खिळे ठोकले. पायावर खिळे ठोकले. येशूच्या अंगातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. येशू शांत होता. आपल्या मारेकऱ्यावरहि तो संतापला नाही. त्याने शेवटची प्रार्थना केली.

"देवा, हे लोक अज्ञानी आहेत. त्याना क्षमा कर!"

या दयाळू शांतिदूताचा असा शेवट झाला. पण त्याने सोसलेला छळ वाया गेला नाही. कांही दिवसानी लोकाना त्याचा उपदेश पटू लागला. त्याला फासावर मरण आले. फास हीच येशूच्या देवपणाची खूण झाली. लोक फासाची आकृति पवित्र मानू लागले. ख्रिस्ती माणसांच्या गळ्यात लहानसा फास असतो. ख्रिस्ती लोकांच्या देवळावर फासाची आकृति असते. त्या फासास क्रॉस असे म्हणतात. तो क्रॉस जगास शांततेचे सामर्थ्य सांगत आहे. दया-धर्माची जाणीव करून देत शांततेचा मार्ग दाखवीत असता येशूला मरण आले. पण त्याचा मार्ग अमर ठरला. दया आणि सेवा हाच शांततेचा मार्ग आहे. याच मार्गाची जगास पुन्हा एकदा आठवण करून द्यावी लागली. त्या शांतिदूताचे आता दर्शन घेऊ या.

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम........
विभाग........
क्रमांक........
नों. दि.......
शाखा

# देवदूत महंमद पगंबर



ख्रिस्ती बंधूंच्या धर्मक्षेत्राची यात्रा आपण केली. आतां त्या धर्मक्षेत्राच्या थोडे खालच्या बाजूस जाऊ. जरा त्रासाचीच आहे ही यात्रा. उन्हाचे चटके बसू लागले. पाय पोळू लागले. एका वाळवंटातून आपण जात आहोत. आसपास कोठे झाड ना झुडूप. घसा कोरडा पडला. पण आसपास पाण्याचा थेंबहि मिळावयाचा नाही. पण तीर्थयात्रा म्हटली की थोडेफार कष्ट व्हायचेच. या कष्टाचे सार्थक होईल.

ती पाहा एक मोठी मशीद दिसू लागली. हे मुसलमानांचे धर्मक्षेत्र आहे. हे मक्का नावाचे क्षेत्र आहे. हिंदूंची जशी काशी तशी मुसलमानांची मक्का. या भव्य मशिदीच्या सावलीत थोडा विसावा घेऊ या.

या ठिकाणी पूर्वी एक मोठे देऊळ होते. दीड हजार वर्षे झाली त्याला. एक दिवस देवळात एक भांडण जुंपले. भांडणाचे कारण अगदी साधे होते. देवळात एक मोठा दगड होता. तो आभाळातून पडला अशी लोकांची समजूत होती. देवळाची दुरुस्ती चालू होती. त्यासाठी तो दगड हालवायचा होता. तो दगड उचलणे हा एक मोठा मान होता. त्यामुळे भांडण जुंपले. शेवटी एका थोर माणसाने ते भांडण तोडले. त्याने आपल्या खांद्यावरची चादर घेतली. त्या चादरीवर तो दगड ठेविला. मग तो त्या भांडणाराना म्हणाला.

"चला ही चादर धरा. सर्वांनी हात लावला कीं दगड हालेल."

ह्या थोर माणसाचे म्हणणे सर्वांना पटले. सर्वांची एकी झाली. ही एकी करणारा जगात एक शांतिदूत ठरला. त्याचे नाव महंमद पैगंबर.

महंमदाचा जन्म मक्केस झाला. त्याच्या जन्मापूर्वीच त्याचे वडील मरण पावले. घरची अगदी गरीबी होती पण महंमदाच्या आईने मुलाचा चांगला सांभाळ केला.

महंमदाच्या लहानपणीच आईहि वारली. मग चुलत्याने त्याला सांभाळले. चुलत्याच्या घरी महंमद मेंढपाळ झाला. गोरगरिबांची महंमदास लहानपणीच ओळख झाली.

त्यावेळी अरब लोक फार मागासलेले होते. आधीच ओसाड प्रदेश. पोटासाठी खूप कष्ट करावे लागत. तरी पोट भरण्याची पंचाईत पडे. अरब लोक फार भोळे होते. वाळवंटात वादळ झाले कीं लहान मोठी टेकाडे तयार होत. अरब लगेच त्या टेकाडांना नमस्कार करीत. अशी देवांची खूप गर्दी झाली होती. देवावरून खूप भांडणे होत. अरब लोक स्त्रियाना गुलामासारखे वागवीत.

महंमदास आपल्या बांधवांचे भोळेपण पाहून फार वाईट वाटे. त्यांचे अज्ञान दूर करण्याचा मार्ग तो शोधू लागला. देवाची तो प्रार्थना करू लागला. गावाजवळ एक डोंगर होता. महंमद त्या डोंगरावर जाई. तासचे तास विचार करीत असे.

अशा स्थितीतच महंमदास एका श्रीमंत बाईकडे नोकरी मिळाली. ती विधवा होती. तिचा नवरा व्यापारी होता. तिचे नाव खादिजाबी. तिने महमदास आपला मुख्य कारभारी नेमले. कांही दिवसानी तिने महंमदाशी लग्न केले. दारिद्र्य संपले. वणवण संपली पण महंमदाची तळमळ थांबली नाही. खऱ्या ज्ञानाचा शोध तो करीतच राहिला.

एक दिवस डोंगरावर बसला होता. तो भोवतालचे जग विसरला. त्या स्थितीत एक देवदूत त्याला दिसला. त्या देवदूताने महंमदास खरा धर्म सांगितला, खरे ज्ञान दिले. महंमदास अतिशय आनंद झाला. देवदूताने दिलेले ज्ञान तो सर्वांना सांगू लागला.

महंमदाने सांगितले, देव एकच आहे. तो मूर्तींत नाही. म्हणून मूर्तिपूजा करूं नका. देवाची प्रार्थना करावी. त्याची आज्ञा पाळावी. सर्व प्राणिमात्राची सेवा करावी. आपल्या प्राप्तीतला कांही

भाग दान करावा. स्त्रियाना मान द्यावा. ज्ञान हे परमेश्वराचेच रूप आहे. म्हणून ज्ञान मिळविणे, ज्ञान देणे ही ईश्वराचीच सेवा आहे.


महंमद हे ज्ञान सांगू लागला. पण जुन्या मताचे लोक खवळले. त्याला ठार करण्याचा त्यांनी कट केला. महंमदास मक्का सोडावी लागली. तो मदिना येथे गेला. मदिनेस त्याचा उपदेश अनेकाना पटला. मदिनेच्या लोकानी आपल्या शहराचा कारभारहि महंमदावर सोपविला. शत्रूनी मदिनेपर्यंत पाठलाग केला तेव्हां महंमदास हाती शस्त्र घ्यावे लागले. त्याने शत्रूचा पराभव केला. त्याचा उपदेश दूरवर पसरू लागला. त्याच्या उपदेशातून 'इस्लाम' हा धर्म निघाला. इस्लाम म्हणजे शांति. महंमदाने इस्लाम धर्माचाच मरेपर्यंत प्रसार केला.

वयाच्या ६० व्या वर्षी त्याची प्रकृति खालावली. मक्केची यात्रा करावी असे त्याला वाटू लागले. तो मक्केस जाण्यास निघाला. हजारो लोक त्याच्याबरोबर निघाले. मक्केच्या लोकानाहि महंमदाचा उपदेश पटला होता. त्यानी महंमदाचे अतिशय आनंदाने स्वागत केले.

मक्केची यात्रा करून महंमद मदिनेस परत आला. पुढे एक दिवस त्याने नेहमीप्रमाणे प्रार्थना केली. अंथरुणावर अंग टाकले. तो मग पुन्हा उठला नाही. आपल्या भोळ्या बांधवाना महंमदाने शहाणे केले. खरा धर्म सांगून धार्मिक भांडणे मिटविली. शांततेचा मार्ग पुन्हा एकदा जगास दाखविला.

अनुक्रम 30708
विभाग बी-बी
क्रमांक 2048
नों. दि. 7/7/61

# ईश्वर अल्ला तेरा नाम



आपण मथुरेस श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. मग भगवान् येशूचा उपदेश ऐकला. मक्केस महंमद पैगंबराची कथा ऐकिली. तीन धर्मक्षेत्रे पाहून आपण आपली तीर्थयात्रा संपविली. श्रीकृष्णाने खरी भक्ति, खरा धर्म याविषयी उपदेश केला. पण लोक तो विसरले. पुन्हा भगवान येशूने जगास शांततेचा मार्ग दाखविला. महंमद पैगंबरास पुन्हा तेच कार्य करावे लागले. दया आणि सेवा हेच तिघांच्याहि उपदेशाचे सार आहे. तोच शांततेचा मार्ग आहे. तोच मार्ग गांधीजी सांगत असत. तोच मार्ग विनोबा दाखवीत आहेत. तो मार्ग सर्वांना पटावा म्हणूनच जगातील शांतिदूत झटत आले आहेत. ते देवाची प्रार्थना करतात.

## सबको सन्मति दे भगवान्




ग्रंथ संग्रहालय,
वाचनालय
ठाणे. वाचनालय शाखा.
IRBK-0108804

अनुक्रम 3070८
विभाग [illegible]
क्रमांक [illegible]
नों. दि. [illegible]